सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

---

क्र.पोमंस/१/संसद-विधानमंडळ कार्यपध्दत/२०२६ मुंबई, दिनांक ०२/०७/२०२६

संदर्भ : १. महाराष्ट्र कार्यालयीन कार्यपद्धती पुस्तिका, २०२३

२. पोलीस महासंचालक यांचे स्थायी आदेश क्र. २३/२०१४.

**विषय : लोकप्रतिनिधी, वरिष्ठ मंत्री माननीय मुख्यमंत्री तसेच विधानमंडळ सचिवालय (विधानसभा व विधानपरिषद)- यांच्याशी पत्रव्यवहार करताना विहित कार्यपध्दतीचे पालन करण्याबाबत.**

* * *

**परिपत्रक**

'महाराष्ट्र शासन कार्यालयीन कार्यपद्धती पुस्तिका २०२३' मध्ये लोकप्रतिनिधी, मंत्रिमंडळातील सदस्य, माननीय मुख्यमंत्री तसेच इतर वरिष्ठ शासकीय प्राधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करण्याची स्थापित प्रशासकीय व्यवस्था नमूद करण्यात आलेली आहे. तसेच, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या **स्थायी आदेश क्र. २३/२०१४** अन्वये सर्व पोलीस घटकांना आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या होत्या की, कोणत्याही शासकीय किंवा अधिकृत कामासाठी विहित साखळी पद्धतीचा (Chain of Command) भंग करून थेट संपर्क साधू नये अथवा परस्पर पत्रव्यवहार करू नये.

परंतु, अलीकडच्या काळात असे निदर्शनास आले आहे की, वरील सूचनांचे गांभीर्याने पालन केले जात नसून, काही घटकांकडून विविध विषयांबाबत वरिष्ठ मंत्री तसेच इतर उच्चस्तरीय प्राधिकाऱ्यांशी थेट पत्रव्यवहार केला जात आहे. ही बाब शासनाने विहित केलेली कार्यपद्धती तसेच विभागीय नियंत्रणाच्या तत्त्वांशी सुसंगत नाही. पत्रव्यवहारामध्ये आवश्यक असलेली एकसूत्रता, समन्वय व प्रशासकीय नियंत्रण बाधित होण्याची शक्यता निर्माण होते.

महाराष्ट्र पोलीस दलामध्ये वरिष्ठ कार्यालयामार्फत पत्रव्यवहार करण्याची स्थापित प्रशासकीय व्यवस्था अस्तित्वात आहे. त्यानुसार सर्व घटक प्रमुखांनी लोकप्रतिनिधी, मंत्रीमंडळातील सदस्य, माननीय मुख्यमंत्री तसेच इतर वरिष्ठ शासकीय प्राधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार करताना खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे :

१) **साखळी पद्धतीचे पालन** (Chain of Command)**:** सर्व पोलीस आयुक्त, परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक आणि इतर युनिट प्रमुखांनी कोणत्याही परिस्थितीत प्रशासकीय साखळीचा (Chain of Command) भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

२) **थेट पत्रव्यवहार :** प्रशासकीय साखळीचे उल्लंघन करून प्राप्त झालेला कोणताही थेट पत्रव्यवहार करू नये. अशा प्रकारचा पत्रव्यवहार करावयाचा झाल्यास विहित प्रशासकीय माध्यमातून पाठविण्याबाबत कळविण्यात यावे.

३) **आर्थिक व धोरणात्मक बाबी:** स्थानिक स्तरावर निकाली काढता येणाऱ्या नियमित बाबी वगळता, ज्या प्रकरणांमध्ये विभागावर कोणताही आर्थिक बोजा पडणार असेल किंवा धोरणात्मक निर्णय घ्यायचा असेल, अशी सर्व प्रकरणे योग्य त्या माध्यमाद्वारे (Proper Channel) वरिष्ठ कार्यालयाकडे मंजुरीसाठी सादर करावीत.

४) **वरिष्ठ मंत्री, माननीय मुख्यमंत्री तसेच विधानमंडळ सचिवालय (विधानसभा व विधानपरिषद)**- यांच्याशी संबंधित आणि तातडीने किंवा उच्च-स्तरीय लक्ष देणे आवश्यक आहे, असा पत्रव्यवहार थेट उद्देशून न करता संबंधित सचिव (Personal Assistant) यांच्या नावे संबोधित केलेले असावे. अशा पत्रव्यवहारामध्ये विहित शासकीय पद्धती व प्रोटोकॉलचे काटेकोर पालन करण्यात यावे.

सर्व घटक प्रमुखांनी आपल्या अधिनस्थ असलेल्या सर्व अधिकारी व अंमलदारांना या सूचना तात्काळ अवगत करून द्याव्यात आणि या आदेशांचे काटेकोरपणे पालन होईल याची वैयक्तिकरीत्या खात्री करावी.

( पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशान्वये)

**(सुप्रिया पाटील-यादव)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे. / दहशतवाद विरोधी पथक, म.रा., मुंबई / वाहतुक, म.रा., मुंबई / (का.व सु.) म.रा., मुंबई / (प्रशासन) म.रा., मुंबई / आर्थिक गुन्हे, म.रा., मुंबई / राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई / फोर्स वन, म.रा., मुंबई / पोलीस दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, म.रा., पुणे. / सायबर, म.रा., मुंबई / बाल अपराध प्रतिबधंक विभाग /नागरी हक्क संरक्षण, म.रा., मुंबई / विशेष कृती, म.रा., मुंबई. / प्रशिक्षण व खास पथके, म.रा., मुंबई / (नि.व.सु.), म.रा., मुंबई.
संचालक, पोलीस समन्वय व दळणवळण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, वडाची वाडी, पुणे
सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक/ पोलीस उप महानिरीक्षक परिक्षेत्रिय / महिला अत्याचार प्रतिबंधक विभाग, म.राज्य, मुंबई / मोटार परिवहन पुणे / रा.रा.पो.बल पुणे / नागपूर / नक्षल विरोधी अभियान, नागपूर/ सायबर सेल, मुंबई
सर्व पोलीस अधीक्षक (जिल्हा / रेल्वे / बिनतारी संदेश)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र
प्राचार्य, गुन्हा अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक
प्राचार्य, अपारंपारीक अभियान प्रशिक्षण केंद्र, नागपूर

प्रत

पोलीस महासंचालक कार्यालयातील सर्व संबंधित वरिष्ठ उपसहायक / उपसहायक / कार्यासन अधिकारी

प्रत पुढील कार्यवाहीसाठी

पोलीस उपअधीक्षक, संगणक कक्ष, महाराष्ट्र राज्य

२. सदरचे परिपत्रक पोलीस महासंचालक कार्यालयाच्या संकेतस्थळावर **"लोकप्रतिनिधी, वरिष्ठ मंत्री तसेच माननीय मुख्यमंत्री यांच्याशी पत्रव्यवहार करताना विहित प्रोटोकॉलचे पालन करण्याबाबत."** कायमस्वरूपी शासन निर्णय / परिपत्रके यावर प्रसिध्द करावे.